दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४७१ वा • मंगळवार, ता. १६ डिसेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## राज्यातील २९ महापालिकांची निवडणूक जाहीर; आजपासून आचारसंहिता लागू

### १५ जानेवारीला मतदान, १६ ला निकाल



**मुंबई | गुरुदत्त वाकदेकर**

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला असून, आजपासून राज्यात आचारसंहिता लागू झाली आहे. या सर्व निवडणुका एकाच टप्प्यात पार पडणार असल्याची घोषणा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज केली.

निवडणूक कार्यक्रमानुसार २३ ते ३० डिसेंबर या कालावधीत उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार आहेत. ३१ डिसेंबर रोजी अर्जांची छाननी होईल. त्यानंतर २ जानेवारी २०२६ पर्यंत उमेदवारी अर्ज माघारी घेता येणार असून, ३ जानेवारीला अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

१५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार असून, १६ जानेवारीला मतमोजणी करून निकाल जाहीर केले जातील.

महापालिका निवडणुकांच्या घोषणेमुळे राज्यातील राजकीय हालचालींना वेग आला असून, सर्वच पक्षांकडून तयारीला सुरुवात झाली आहे. काही उमेदवारांनी मतदारांच्या थेट दारात डस्टबीण पोहोच केले असून अनेकांनी पैठण्याचा खेळ आधीच केल्याचे कळते. आचारसंहिता लागू झाल्याने सरकारी यंत्रणांवर निवडणूक आयोगाचे निर्बंध तत्काळ लागू झाले आहेत.

**जिल्हा परिषदेच्या निवडणुकांचे काय होणार?**

राज्यातील आरक्षण वाद नसलेल्या १२ जिल्हा परिषदांच्या निवड़णुका घेण्यात येणार आहेत. उरलेल्या जेथे वाद आहे, त्या सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतर होतील. झेडपीच्या निवडणुकांसाठी जास्त मनुष्यबळ लागते. त्यामुळे महापालिकाच्या निवडणुकानंतर जसे मनुष्यबळ मोकळे होईल, तशा १२ झेडपींच्या निवडणुका एका टप्प्यात घेतल्या जातील.

- निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे



## प्राणाची पर्वा न करता दहशतवाद्याशी झुंज

### अहमदच्या धाडसाला जगाचा सलाम

**सिडनी | रयत समाचार**

ऑस्ट्रेलियातील सिडनी शहरातील बोंडी बीच परिसरात झालेल्या दहशतवादी हल्ल्यात ४४ वर्षीय अहमद अल-अहमद यांनी दाखवलेल्या अपूर्व धैर्यामुळे अनेक निष्पाप नागरिकांचे प्राण वाचले. अहमद नि:शस्त्र असतानाही त्यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून दहशतवाद्याचा सामना केला आणि त्याच्याकडील बंदूक हिसकावून परिस्थिती नियंत्रणात आणली. बोंडी बीचवर सुरू असलेल्या हनुक्का उत्सवाच्या वेळी दोन हल्लेखोरांनी अंदाधुंद गोळीबार सुरू केला. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला. लोक जीव वाचवण्यासाठी सैरावैरा पळू लागले. याच वेळी अहमद अल-अहमद हे आपल्या चुलत भावासोबत तेथे उपस्थित होते. गोळीबाराचा आवाज ऐकताच दोघेही वाहनांच्या आड लपले.

परिस्थिती गंभीर असल्याचे लक्षात येताच अहमद यांनी कोणताही शस्त्र नसतानाही थेट हल्लेखोराकडे धाव घेतली. योग्य संधी साधत त्यांनी मागून दहशतवाद्यावर झडप घातली, त्याला खाली पाडले आणि त्याच्याकडील रायफल हिसकावून घेतली. त्यामुळे अनेक नागरिकांना सुरक्षितपणे पळून जाण्यास वेळ मिळाला.

या झटापटीदरम्यान अहमद जखमी झाले. नंतर दुसऱ्या हल्लेखोराने त्यांच्यावर गोळीबार केला, ज्यात त्यांच्या खांद्यावर गोळ्या लागल्या. गंभीर अवस्थेत त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या ते सेंट जॉर्ज रुग्णालयात उपचार घेत असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

अहमद यांचे कुटुंबीय म्हणाले की, अहमदला बंदूक वापरण्याचे कोणतेही प्रशिक्षण नव्हते. तरीही केवळ मानवतेच्या भावनेतून त्यांनी हा धाडसी निर्णय घेतला. ''लोकांचे प्राण वाचवणे हेच माझ्यासाठी महत्त्वाचे होते,'' असे अहमद यांनी शुद्धीवर आल्यानंतर सांगितले. या घटनेनंतर ऑस्ट्रेलियासह जगभरातून अहमद यांच्या शौर्याचे कौतुक होत आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही त्यांच्या धैर्याचे कौतुक करत 'खरा नायक' असे संबोधले. ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनीसुद्धा अहमद यांच्या साहसामुळे अनेकांचे जीव वाचल्याचे सांगितले.

दरम्यान, अहमद यांच्या उपचारासाठी आणि कुटुंबाच्या मदतीसाठी ऑनलाइन निधी संकलन सुरू करण्यात आले असून काही तासांतच कोट्यवधी रुपयांची मदत जमा झाली आहे. संपूर्ण ऑस्ट्रेलिया आज या धाडसी नागरिकाला सलाम करत आहे.

## मराठी शाळांच्या अस्तित्वासाठी १८ डिसेंबरला जनांदोलन

### हुतात्मा स्मारकापासून महापालिकेपर्यंत मोर्चा




**मुंबई | रयत समाचार**

मराठी शाळा, मराठी भाषा आणि मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी येत्या १८ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता मुंबईत सर्वसामान्य मराठी जनतेच्या वतीने शांततापूर्ण व सनदशीर आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. हुतात्मा स्मारक येथे हुतात्म्यांना अभिवादन करून, लोक शांतपणे चालत महानगरपालिकेच्या मुख्यालयापर्यंत येतील व मराठी शाळांच्या प्रश्नावर ठाम भूमिका मांडतील, अशी माहिती मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष डॉ. दीपक पवार आणि चिन्मयी सुमीत आनंद भंडारे यांनी दिली आहे.

याबाबत महानगरपालिका आयुक्त, तसेच माता रमाबाई आंबेडकर पोलीस स्टेशन आणि आझाद मैदान पोलीस स्टेशन यांना लेखी पत्रे देण्यात आली असून, सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून हे आंदोलन होत आहे, असे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. मराठी शाळा, मराठी भाषा व मराठी माणसाबाबत वर्षभरात कधीही बोलण्याचा आणि आंदोलन करण्याचा लोकशाही अधिकार अबाधित राहिला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

फक्त पत्रकार म्हणून नाही, तर चळवळीचे कार्यकर्ते म्हणून सोबत या. एकत्र लढलो तरच यशाची शक्यता आहे, असे भावनिक आवाहन करत त्यांनी आंदोलनाला व्यापक पाठिंबा देण्याचे आवाहन केले.

यावेळी बोलताना आयोजकांनी पोलिसांच्या दुजाभावाच्या भूमिकेवरही तीव्र शब्दांत टीका केली. राजकीय पक्षांचे ताफे हुतात्मा स्मारक परिसरात येतात तेव्हा पोलिसांची भूमिका वेगळी असते; मात्र सर्वसामान्य नागरिकांनी हुतात्म्यांना अभिवादन करून आंदोलन सुरू करण्याचा प्रयत्न केला, की कायद्याची वेगळीच कलमे पुढे आणली जातात, असा आरोप करण्यात आला.

२९ जून २०२५ रोजी मराठी अभ्यास केंद्राच्या पुढाकाराने दोन शासन निर्णयांच्या प्रतिकात्मक होळीप्रकरणी २५० कार्यकर्त्यांवर एफआयआर दाखल करण्यात आली; मात्र त्या आंदोलनात सहभागी असलेल्या प्रमुख राजकीय नेत्यांची नावे एफआयआरमध्ये टाळण्यात आली, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. ''सामान्यांना घाबरवणे सोपे; पण सत्ताधाऱ्यांच्या नावाने राजकीय वादंग होईल, याची काळजी यंत्रणांना असते,'' असा आरोप त्यांनी केला.

मराठी शाळांचा प्रश्न हा केवळ शिक्षणाचा नसून आपल्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. निवडणुका येतील-जातील, पण मराठी शाळांसाठीचे आंदोलन थांबणार नाही, असा निर्धार व्यक्त करत आयोजकांनी माध्यमांमधील पत्रकार, कार्यकर्ते आणि मराठीप्रेमी नागरिकांनी या आंदोलनात सक्रिय सहभाग घ्यावा, तसेच ही माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन केले आहे.


## इतिहास रचला; संगीता बरुआ पिशारोती प्रेस क्लब ऑफ इंडियाच्या पहिल्या महिलाध्यक्षा

**नवी दिल्ली | रयत समाचार**



ज्येष्ठ पत्रकार आणि 'द वायर' या डिजिटल माध्यमाच्या सहसंपादिका संगीता बरुआ पिशारोती यांनी दिल्लीतल्या प्रेस क्लब ऑफ इंडियाच्या अध्यक्षपदाची धुरा स्वीकारत इतिहास रचला आहे. या प्रतिष्ठित संस्थेच्या त्या पहिल्या महिला अध्यक्ष ठरल्या आहेत

नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत संगीता बरुआ पिशारोती यांना १०९ मतांचे स्पष्ट बहुमत मिळाले. त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवारांना अनुक्रमे २३ आणि १८ मते मिळाली. विशेष म्हणजे, पिशारोती यांच्या संपूर्ण पॅनलनेही मोठ्या फरकाने विजय मिळवला आहे. या निवडणुकीत ज्येष्ठ पत्रकार जतीन गांधी यांची उपाध्यक्षपदी, तर पत्रकार अफजल इमाम यांची सरचिटणीसपदी निवड झाली आहे. संगीता बरुआ पिशारोती या गेल्या अनेक दशकांपासून पत्रकारितेत सक्रिय




असून, त्यांनी द हिंदूसह विविध राष्ट्रीय माध्यमांत महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. ईशान्य भारतासह देशातील सामाजिक, राजकीय आणि लोकशाहीविषयक प्रश्नांवर त्यांनी केलेले निर्भीड व सखोल वार्तांकन विशेष उल्लेखनीय ठरले आहे.

प्रेस क्लब ऑफ इंडियाच्या अध्यक्षपदी एका महिलेची निवड होणे ही भारतीय पत्रकारितेसाठी ऐतिहासिक आणि प्रेरणादायी घटना मानली जात आहे. **महिला नेतृत्व, पत्रकार स्वातंत्र्य आणि माध्यमांच्या स्वायत्ततेच्या दृष्टीने हा टप्पा महत्त्वाचा असल्याचे मत पत्रकार वर्तुळातून व्यक्त होत आहे.**

## पोस्टमन म्हणजे विश्वासाचा सेतू- ज्योतिरादित्य सिंधिया

### ६ हजार ग्रामीण डाक सेवकांना मंत्र

**कोल्हापूर | भुषण तांबे**




ग्रामीण भारताला विकासाच्या मुख्य प्रवाहाशी जोडणाऱ्या टपाल कर्मचाऱ्यांची भूमिका अतुलनीय असून, पोस्टमन हे केवळ पत्र पोहोचवणारे नाहीत, तर बँकिंग, विमा व शासकीय सेवा घराघरात नेणारे विश्वासाचे सेतू आहेत, असे प्रतिपादन केंद्रीय दळणवळण मंत्री तसेच ईशान्य क्षेत्र विकास मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी केले. १३ डिसेंबर २०२५ रोजी कोल्हापूर येथे आयोजित ग्रामीण डाक सेवक संमेलनात गोवा व पुणे प्रदेशातील सुमारे ६ हजार ग्रामीण डाक सेवकांना संबोधित करताना त्यांनी हे मत व्यक्त केले. ओघवत्या व प्रभावी मराठी भाषणात त्यांनी टपाल कर्मचाऱ्यांच्या अखंड सेवाभावाचे कौतुक केले.

ग्रामीण डाक सेवकांसाठी राबविण्यात आलेल्या विविध सुधारणा आणि उपक्रमांचा आढावा देताना श्री. सिंधिया यांनी कर्मचाऱ्यांच्या मुलांना केंद्रीय विद्यालयांमध्ये प्रवेश, भत्त्यांमध्ये वाढ, नवीन गणवेश व जॅकेट, तसेच 'प्रोजेक्ट ॲरो' यांसारख्या उपक्रमांचा उल्लेख केला. या सुधारणा गावागावांत कार्यरत कर्मचाऱ्यांचे अनुभव ऐकून आणि त्यांना सक्षम करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेतूनच शक्य झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. देशभरातील १.६५ लाख टपाल कार्यालये आणि ६.५ लाख गावांपर्यंत पोहोच असलेल्या भारतीय डाक विभागाच्या अद्वितीय क्षमतेचा उल्लेख करत, विभागाला आधुनिक लॉजिस्टिक्स व सेवा केंद्र म्हणून अधिक सक्षम करण्याचे आवाहन त्यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ''डाकिया अब बँक लाया'' या संकल्पनेचा उल्लेख करत, भारतीय डाक विभागाने आर्थिक समावेशन व नागरिक सेवा पुरविणारे विश्वासार्ह माध्यम म्हणून स्वतःचा विस्तार केल्याचे त्यांनी सांगितले. ''सेवा भाव'' हे टपाल विभागाचे मूलभूत मूल्य असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

संमेलनाला छत्रपती शाहू महाराज, खासदार, धनंजय महाडिक, खासदार, जितेंद्र गुप्ता, महासंचालक, टपालसेवा, सुवेंदूकुमार स्वैन, सदस्य (कार्मिक), टपाल सेवा मंडळ, तसेच अमिताभ सिंह, मुख्य पोस्टमास्तर जनरल, महाराष्ट्र सर्कल यांची प्रमुख उपस्थिती होती.

समारोप करताना सिंधिया यांनी टपाल कर्मचाऱ्यांना अभिमान, समर्पण आणि नावीन्यपूर्ण दृष्टिकोनातून सेवा देत राहण्याचे आवाहन केले.

## मराठी साहित्य व कला सेवा आयोजित २२ वे कविसंमेलन



**मुंबई | गुरुदत्त वाकदेकर**

दादर येथील इंडियन एज्युकेशन सोसायटी, राजा शिवाजी विद्यालय, हिंदू कॉलनी येथे मराठी साहित्य व कला सेवा आयोजित २२वे कविसंमेलन रविवार, १४ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी अत्यंत शिस्तबद्ध, साहित्यिक आणि रसिक वातावरणात संपन्न झाले. शब्द, भावना आणि अभिव्यक्तींचा संगम रसिकांसाठी अविस्मरणीय ठरला.

कार्यक्रमात ''स्वप्नांची शिदोरी'', ''वर्षाअखेरचे क्षण'' आणि मुक्त विषय यावर आधारित कविता सादर करण्यात आल्या. आशा, संघर्ष, आत्मपरीक्षण, आठवणी आणि नव्या संकल्पांची काव्यमय मांडणी करणाऱ्या रचनांनी रसिकांची मने जिंकली. प्रभावी अभिवाचनामुळे प्रत्येक कविता श्रोत्यांच्या मनात खोलवर पोहोचली.

या कविसंमेलनात अशोक सहदेव सुकाळे, कृपा राकेश म्हात्रे, गिरीश मुरलीधर शेळगीकर, चंद्रकांत दढेकर (अभिवाचन), ज्ञानेश्वर गोपाळराव गोतावळे, डॉ. मानसी पाटील, धनंजय पांडुरंग पाटील, महेश रामनाथ वैजापूरकर (अभिवाचन), मोहित जनार्दन तांडेल, योगिता दशरथ कदम, विक्रांत मारूती लाळे, विलास मारुती अडसुळे, वैभवी विनीत गावडे, प्रल्हाद रामकिशन कसबेकर, प्रकाश वानखेडे आणि गुरुदत्त दिनकर वाकदेकर यांनी आपापल्या रचना मनोभावने मांडल्या आणि रसिकांना प्रभावित केले.

कार्यक्रमाच्या आस्वादक म्हणून वर्षा गिरीश शेळगीकर यांनी सूक्ष्म निरीक्षणांसह काव्याचा रसग्रहणात्मक आढावा घेतला. निवेदन वैभवी विनीत गावडे यांनी ओघवत्या शैलीत केले, तर आभार प्रदर्शन गुरुदत्त दिनकर वाकदेकर यांनी केले. छायाचित्रण विक्रांत मारूती लाळे यांनी केले. अल्पोपहाराची व्यवस्था कृपा राकेश म्हात्रे आणि मोहित जनार्दन तांडेल यांनी स्वेच्छेने सांभाळली.

मराठी साहित्य व कला सेवाचे संस्थापक व अध्यक्ष गुरुदत्त दिनकर वाकदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कविसंमेलनाने मराठी साहित्याची समृद्ध परंपरा, सर्जनशीलता आणि रसिक संस्कृती यांचे प्रभावी दर्शन घडवले. शिस्तबद्ध आयोजन आणि रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे २२वे कविसंमेलन यशस्वी ठरले.

आयोजकांनी पुढील उपक्रमाची माहिती दिली; २३वे कवी संमेलन ११ जानेवारी २०२६ रोजी आयोजित होणार आहे. साहित्यप्रेमींसाठी हा उपक्रमही तितकाच प्रेरणादायी ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## माजी सैनिक राजकीय आरक्षणाला पवारांचा पाठिंबा

**मुंबई | रयत समाचार**

महाराष्ट्र राज्यातील माजी सैनिकांना राजकीय आरक्षण मिळावे, यासाठी राज्यभरातील विविध सैनिक संघटनांकडून गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर भारताचे माजी संरक्षण मंत्री तथा खासदार शरदचंद्र पवार यांची माजी सैनिकांच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या भेटीत माजी सैनिकांच्या राजकीय आरक्षणासंदर्भातील विविध मागण्यांवर सखोल विचारविनिमय झाला.

या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत खासदार शरद पवार यांनी सैनिकांबद्दल आपल्याला अभिमान असल्याचे सांगितले. संरक्षण मंत्री असताना सैनिकांचा खडतर, शिस्तबद्ध व त्यागमय प्रवास आपण जवळून पाहिल्याचे त्यांनी नमूद केले. सैनिक अत्यंत प्रामाणिकपणे आणि निष्ठेने देशसेवा करत असतात. त्यामुळे जर सैनिकांना राजकीय क्षेत्रात आरक्षण मिळाले, तर विकासकामांमध्ये शिस्त, पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा निश्चितपणे दिसून येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

माजी सैनिकांच्या राजकीय आरक्षणाचा विषय येत्या काळात गांभीर्याने पुढे नेण्यात येईल, आश्वासन दिले.

## शहाजी महाराज समाधिस्थळ स्मारकासाठी पाच कोटी





**बेळगाव | श्रीकांत काकतीकर**

अथणी शहरातील शिवाजी चौकात रविवारी शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान अथणी व अथणी तालुका मराठा समाज संघटनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले.

या कार्यक्रमात बोलताना बेळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री सतीश जारकिहोळी म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे कोणत्याही एका धर्मापुरते मर्यादित नव्हते. ते सर्व समाजाच्या प्रेमास पात्र होते. संपूर्ण देशाचा ते अमूल्य ठेवा असून त्यांच्या विचारधारा आजही सर्वांसाठी आदर्श आहेत. दावणगेरे जिल्ह्यातील होदिगेरी येथे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील शहाजी महाराज यांच्या समाधिस्थळाच्या स्मारकासाठी पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, बेळगाव येथे एक कोटी रुपये खर्चून स्मारक उभारण्याचे नियोजन असल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी कामगार मंत्री संतोष लाड, मराठा जगद्गुरू मंजूनाथ भारती स्वामी, गच्चीन मठाचे शिवबसव स्वामी, मोटगी मठाचे प्रभु चन्नबसव स्वामी, शेट्टर मठाचे मरुळसिद्ध स्वामी, कवळगुड्डाचे सिद्धयोगी अमरेश्वर महाराज, ककमरीचे अभिनव गुरुलिंग जंगम स्वामी, आमदार रमेश जारकीहोळी, विक्रमसिंह सावंत, समाधान अवताडे, मारुतीराव मुळे, माजी आमदार महेश कुमठळी, माजी विधानपरिषद सदस्य महांतेश कवटगीमठ, शहजान डोंगरगाव, अरविंद देशपांडे, नगराध्यक्ष शिवलीला बुटाळे, स्थायी समिती अध्यक्ष दत्ता वास्टर, विविध क्षेत्रांतील नेते तसेच मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते.

# अन्यायकारक मालमत्ता कर नोटीसी रद्द करा– आम आदमी पार्टी

**अहमदनगर । रयत समाचार**

शहरातील नागरिकांना देण्यात येत असलेल्या सुधारित मालमत्ता कराच्या नोटिसांमध्ये मोठ्या प्रमाणात त्रुटी असून या नोटिसा अन्यायकारक असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टी अहिल्यानगरच्या वतीने महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आम आदमी पार्टीचे शहराध्यक्ष भरत खाकाळ यांच्यासह दिलीप घुले, महिला अध्यक्ष विद्या शिंदे, राजू गुजर, संदीप पखाले, राम शिंदे, सुनील ठाकरे, मच्छिंद्र शिंदे, सिताराम खाकाळ आदी पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अनेक नागरिकांना यापूर्वी भरत असलेल्या मालमत्ता कराच्या तुलनेत पाचपटीने वाढीव कराच्या नोटिसा देण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी शेजारी झालेल्या बांधकामाचा वाढीव कर चुकून इतर नागरिकांच्या नावावर टाकण्यात आला आहे. बहुतांश ठिकाणी मालमत्ताधारक उपस्थित नसताना सर्वेक्षण करण्यात आले असून, दुसऱ्या व्यक्तींच्या माहितीवर आधारित चुकीच्या पद्धतीने वाढीव कर आकारण्यात आल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच नोटिसांमधील दरवाढ चुकीच्या वर्गीकरण पद्धतीने करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, प्रभाग क्रमांक सहा व सातमध्ये



नियमित व पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होत नाही. रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय असून कचरा, गटारी, तुंबलेल्या नाल्या व स्वच्छतेच्या समस्या कायम आहेत. शहरातील अनेक चौकांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, पथदिवे व लाईट उपलब्ध नाहीत. सरकारी शाळांची अवस्था चिंताजनक असून ज्येष्ठ नागरिक, महिला, अंध व दिव्यांगांसाठी घरपोच सुविधांचा अभाव आहे.

अशा अनेक मूलभूत समस्या प्रलंबित असताना सुविधा न देता नागरिकांवर मोठ्या प्रमाणात करवाढ लादणे अन्यायकारक असल्याचे आम आदमी पार्टीने स्पष्ट केले आहे. चुकीच्या नोटिसा तात्काळ रद्द कराव्यात, त्रुटी असलेल्या प्रकरणांचे दुबार सर्वेक्षण करावे व कंत्राटी पद्धतीचा आढावा घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. मालमत्ता कर वाढ मान्य नसून याबाबत महापालिकेने लेखी निर्णय द्यावा, अन्यथा संपूर्ण शहरात तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

# ‘साहित्य ज्ञानयज्ञ’ पुरस्काराने बाळासाहेब देशमुख गौरवले

**अहमदनगर । रयत समाचार**

कोल्हापूर येथील कवी सरकार स्वाभिमानी वाचनालय यांच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या राज्यस्तरीय पुरस्कारांमध्ये ज्येष्ठ कथालेखक बाळासाहेब देशमुख यांना राज्यस्तरीय ‘साहित्य ज्ञानयज्ञ’ पुरस्कार जाहीर झाला आहे. पुरस्काराचे अधिकृत निवडपत्र कवी सरकार विलास पाटील यांच्या हस्ते नुकतेच देशमुख यांना प्रदान करण्यात आले.

हा मानाचा पुरस्कार २६ वे ग्रामीण साहित्य संमेलन, कोल्हापूर येथे प्रदान करण्यात येणार असून हे संमेलन करवीर वाचन मंदिर, भवानी मंडप, कोल्हापूर येथे संपन्न होणार आहे. संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध साहित्यिक व कवी गोविंद त्रिंबकराव लहाने (सोनपेठ, परभणी) यांची निवड करण्यात आली.



संमेलनाध्यक्ष गोविंद त्रिंबकराव लहाने यांच्या हस्ते बाळासाहेब देशमुख यांना पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

या साहित्य संमेलनात बाळासाहेब देशमुख यांचा विशेष कथाकथन कार्यक्रमही आयोजित करण्यात आला आहे. देशमुख यांनी साहित्य क्षेत्रात प्रासंगिका, वात्रटिका, ललित लेखन तसेच कथालेखन या विविध साहित्यप्रकारांत विपुल लेखन केले आहे. त्यांचा बहुप्रतिक्षित कथासंग्रह ‘रंग माझा वेगळा’ लवकरच वाचकांच्या भेटीला येणार आहे.

पुरस्काराबद्दल साहित्यिक सदानंद भणगे, चंद्रशेखर जोशी, उदय वैद्य, पोपटराव धामणे, बाळासाहेब कोठुळे, आत्माराम शेवाळे, सुरेखा घोलप आदी मान्यवरांनी बाळासाहेब देशमुख यांचे अभिनंदन केले आहे.

# अहमदनगर जायका’कडून ब्लँकेट वाटप

**अहमदनगर । आबीद खान**

वाढत्या थंडीच्या पार्श्वभूमीवर समाजातील लहानग्यांचे आरोग्य व सुरक्षितता जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन अहमदनगर जायका हॉटेलचे संचालक नईम सरदार यांनी केले. थंडी ही केवळ ऋतूजन्य अडचण नसून लहान मुलांसाठी आजारांना आमंत्रण देणारी ठरू शकते. अशा परिस्थितीत गरजू मुलांना उबदार ब्लँकेट वाटपाचा उपक्रम हा केवळ मदतीचा कार्यक्रम नसून माणुसकी आणि सामाजिक बांधिलकीचे जिवंत उदाहरण असल्याचे ते म्हणाले.

अहमदनगर जायका हॉटेलच्यावतीने तपोवन रोड येथील बालघर प्रकल्पातील विद्यार्थ्यांना गरम ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम अहमदनगर जायका हॉटेलचे संचालक नईम सरदार यांच्या हस्ते पार पडला. यावेळी बालघर प्रकल्पाचे युवराज गुंड, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी बोलताना नईम सरदार म्हणाले की, थंडीच्या दिवसांत उबदार ब्लँकेट ही केवळ एक वस्तू नसून ती मायेचा स्पर्श, काळजीची भावना आणि संरक्षणाची हमी आहे. या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार असून लहानग्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य हेच या कार्यक्रमाचे खरे यश आहे.

बालघर प्रकल्पाचे युवराज गुंड यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, हा उपक्रम राबविणाऱ्या सर्व आयोजकांचे मनापासून अभिनंदन करतो. सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून अशा उपक्रमांची सातत्याने अंमलबजावणी करणे खरोखरच कौतुकास्पद आहे. गरजू घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविणे हीच खरी सेवा असून यामुळे समाजात आपुलकी, विश्वास आणि एकात्मतेची भावना बळकट होते. आबीद खान म्हणाले, या प्रेरणादायी उपक्रमातून इतरांनीही प्रेरणा घेऊन सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे. लहान मुलांचे आरोग्य, शिक्षण आणि सुरक्षित भविष्य यासाठी प्रत्येकाने आपल्या परीने योगदान दिल्यास निश्चितच संवेदनशील, सशक्त आणि मानवी मूल्यांवर आधारित समाज निर्माण होईल.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवराज गुंड यांनी केले, तर आभार प्रदर्शन आबीद खान यांनी केले.

# पंचवटीनगर येथे सर्वरोग आरोग्य तपासणी शिबिर

**अहमदनगर । रयत समाचार**

धकाधकीच्या जीवनशैलीमुळे नागरिक विविध आजारांना सामोरे जात आहेत. अनेक वेळा आर्थिक परिस्थितीमुळे आजारपण अंगावर काढले जाते. वेळेवर निदान व उपचार न झाल्यास गंभीर परिस्थिती उद्भवू शकते. त्यामुळे मोफत सर्वरोग आरोग्य तपासणी शिबिरे ही काळाची गरज बनली असल्याचे प्रतिपादन आयुर्वेद महाविद्यालयाचे




अध्यक्ष ॲड. सचिन जगताप यांनी केले. पंचवटी नगर येथे आयोजित मोफत सर्वरोग आरोग्य तपासणी शिबिरात ते बोलत होते. या शिबिराच्या माध्यमातून आजारांचे वेळेवर निदान होऊन डॉक्टरांकडून योग्य उपचार व मार्गदर्शन करता येते, असेही त्यांनी नमूद केले. गेल्या आठ वर्षांपासून सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी डॉ. सागर बोरुडे राबवत असलेला उपक्रम कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, आयोजक माजी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, माजी नगरसेविका मीनाताई चव्हाण यांच्यासह रोहिणी अंकुश, हेमलता कांबळे, रंजना उकिरडे, जयश्री कुटे, आशाबाई गायकवाड, वैशाली राजहंस, श्रुतिका दरेकर, अनिता भोसले, आदित्य काकडे, धीरज लोणारे, विनोद जोंधळे आदी उपस्थित होते.

# बिबट्यामुक्त संगमनेरसाठी जनआक्रोश

**संगमनेर । रयत समाचार**

तालुक्यात बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली असून, याच पार्श्वभूमीवर सोमवारी ‘‘बिबट्यामुक्त संगमनेर’’ असा ठाम संदेश देत जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात आमदार सत्यजित तांबे, माजी आमदार सुधीर तांबे, बिबट्यांच्या हल्ल्यात बळी पडलेल्या कुटुंबीयांसह शेकडो नागरिक सहभागी झाले होते. या हल्ल्यांमध्ये आतापर्यंत अनेक बळी गेले असून, नुकतेच सहा वर्षांच्या चिमुकलीचा मृत्यू झाल्याने आंदोलकांनी मृतांना न्याय देण्याची तसेच मानव–बिबट्या संघर्ष रोखण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करण्याची मागणी केली. आमदार सत्यजित तांबे यांनी वनविभागाच्या कार्यपद्धतीवर तीव्र टीका करत, बिबट्यांचे व्यवस्थापन पूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप केला. बिबट्यांची प्रायोगिक तत्त्वावर नसबंदी करावी, पिंजऱ्यांची संख्या वाढवावी, नरभक्षक बिबट्यांना ठार मारण्याचे आदेश द्यावेत, तसेच शेतकऱ्यांना स्वसंरक्षणासाठी कायदेशीर संरक्षण व बंदुकीचे परवाने देण्यात यावेत, अशा मागण्या त्यांनी केल्या.

# सुरभी हॉस्पिटलच्या वैद्यकीय सेवेला नवे बळ

## तीन तज्ञ डॉक्टरांचा समावेश; रुग्णसेवेत गुणवत्ता अधिक वृद्धिंगत

**अहमदनगर । रयत समाचार**

येथील छत्रपती संभाजीनगर रोडवरील सुरभी हॉस्पिटलमधे वैद्यकीय सेवांचा दर्जा अधिक उंचावणाऱ्या तीन नामवंत व अनुभवी तज्ञ डॉक्टरांचा समावेश करण्यात आला असून, यानिमित्ताने हॉस्पिटल प्रशासनाच्या वतीने त्यांचे हार्दिक स्वागत करण्यात आले.

क्रिटिकल केअर व आयसीयू विभागात डॉ. शेंदूरकर (, मेडिसिन) आणि डॉ. शुभम राजेश ओस्तवाल (, ॲनेस्थेशिया) यांनी इंटेन्सिव्हिस्ट म्हणून सुरभी हॉस्पिटलमध्ये रुजू होऊन सेवा सुरू केली आहे. हे दोन्ही तज्ञ डॉक्टर डॉ. प्रियान जुनागडे यांच्या नेतृत्वाखाली क्रिटिकल केअर व आयसीयू विभागाची जबाबदारी सांभाळणार असून, त्यामुळे गंभीर आजारांवरील उपचार



अधिक सक्षम व प्रभावी होणार आहेत.

तसेच ऑर्थोपेडिक्स व जॉइंट रिप्लेसमेंट विभागात डॉ. अनंत गायकवाड यांनी कन्सल्टंट ऑर्थोपेडिक सर्जन म्हणून कार्यभार स्वीकारला आहे. ते ज्येष्ठ ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. विलास व्यावहारे यांच्यासोबत कार्य करणार असून, हाडांचे आजार, अपघाती दुखापती तसेच सांधेरोपण शस्त्रक्रियांसाठी रुग्णांना अधिक सुसज्ज व आधुनिक उपचार मिळणार आहेत. या तिन्ही अनुभवी तज्ञ डॉक्टरांच्या समावेशामुळे सुरभी हॉस्पिटलची आधुनिक, दर्जेदार व रुग्णकेंद्रित उपचारांप्रतीची बांधिलकी अधिक दृढ झाली आहे. रुग्णांचे हित, सुरक्षितता आणि सर्वोच्च दर्जाची वैद्यकीय सेवा देणे हाच आमचा मुख्य उद्देश असून, समाजाला नैतिक व सर्वसमावेशक आरोग्यसेवा देण्यासाठी सुरभी हॉस्पिटल सदैव कटिबद्ध असल्याचे हॉस्पिटल प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# मनपा शाळांना बळ देण्याची गरज– लगड

**अहमदनगर । रयत समाचार**

> या सर्व शाळांची मिळून एकूण पटसंख्या केवळ ७८८ इतकी असून ही बाब अत्यंत चिंताजनक असल्याचे मत सरकारी शाळा वाचवा आणि मोफत शिक्षण न्याय व हक्क परिषद (अभियान), महाराष्ट्र राज्यचे मुख्य संयोजक सुदाम लगड यांनी व्यक्त केले. मनपा शाळा कधी काळी शहराच्या शैक्षणिक वैभवाचे प्रतीक होत्या. याच शाळांमधून शिक्षण घेऊन अनेक अधिकारी, लोकप्रतिनिधी, नगरसेवक व उद्योजक घडल्याची आठवण त्यांनी करून दिली.

शहरातील महानगरपालिकेच्या शाळांची अवस्था दिवसेंदिवस चिंताजनक होत चालली आहे. कधी काळी शहरात २७ मनपा शाळा कार्यरत होत्या; मात्र सध्या केवळ ११ शाळाच सुरू आहेत. माहिती अधिकारांतर्गत प्राप्त माहितीनुसार सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत या ११ शाळांमधील एकूण विद्यार्थी संख्या केवळ ७८८ इतकी आहे. शहराच्या लोकसंख्येच्या तुलनेत ही संख्या अत्यंत कमी असून मनपा शाळांच्या भवितव्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

भुतकरवाडी येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज प्राथमिक विद्यालयात ३६ विद्यार्थी, भोसले आखाडा येथील छत्रपती शाहू महाराज प्राथमिक विद्यालय (मनपा शाळा क्र. १६) येथे केवळ १३ विद्यार्थी, तर सर्जेपुरा येथील महानगरपालिका शाळा क्र. १३ मध्ये ३३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. केडगाव येथील मनपा शाळा (आदर्श नगर) येथे ३९ विद्यार्थी, तसेच सर्जेपुरा येथील अहिल्याबाई होळकर महानगरपालिका शाळा क्र. ११ मध्ये ३३ विद्यार्थ्यांची पटसंख्या आहे.



सावेडी येथील महात्मा ज्योतिबा फुले प्राथमिक विद्यालयात ११८ विद्यार्थी, रेल्वे स्टेशन परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालयात १७२ विद्यार्थी, तर गांधीनगर, बोल्हेगाव येथील मनपा प्राथमिक शाळेत १८३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. झारेकर गल्ली येथील लोकमान्य टिळक प्राथमिक विद्यालय (निरीक्षण गृह व बालगृह कॅम्पस) येथे ४५ विद्यार्थी, केडगाव येथील ओंकार नगरमधील महानगरपालिका प्राथमिक शाळेत ७७ विद्यार्थी, तर अयोध्यानगर, केडगाव, रेल्वे स्टेशन परिसरातील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे प्राथमिक शाळेत ३९ विद्यार्थी आहेत. आज मनपा शाळांची पटसंख्या वाढवण्यासाठी शहराचे लोकप्रतिनिधी, मनपा प्रशासन, शिक्षक, पालक आणि नागरिक यांनी एकत्र येऊन ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. शैक्षणिक गुणवत्ता, आधुनिक सुविधा, डिजिटल शिक्षण तसेच स्वच्छ व सुरक्षित शालेय वातावरण याकडे लक्ष दिल्यास मनपा शाळांवरील विश्वास पुन्हा निर्माण होऊ शकतो. मनपा शाळा कशा सुधारतील आणि त्यासाठी वैयक्तिक पातळीवर काय योगदान देता येईल, याचा विचार करण्याचे आवाहन श्री. सुदाम लगड यांनी केले आहे.

दैनिक रयत समाचारचा ख्रिसमस विशेषांक
गुरूवार, ता.२५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होत आहे
ख्रिसमस विशेषांक
अंकासाठी लेख, माहिती, जाहीराती पाठवाव्यात
अतिथी संपादक
सॅम्युअल वाघमारे
8788412780
संपादक
भैरवनाथ वाकळे
8805401800
रयत समाचार महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक
जाहीरात पाठविण्यासाठी संपर्क क्रमांक
भैरवनाथ- ८८०५४०१८००, दिपक- ७७७४००१८००,
तुषार- ७९७२३४४४७४, पंकज-९८२२४९६६६४

रयत समाचार Classified छोटी जाहिरात
छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद
खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

STAR HEALTH
आपण कष्टाने कमावलेला पैसा हॉस्पिटल मध्ये बील भरण्यासाठी आहे का?




* अधिक माहितीसाठी संपर्क *
9049860184, 8208235485

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

दैनिक रयत समाचार
अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...
त्वरित नियुक्त करणे आहेत
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
आम्ही काय देणार
* पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद–विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# कथनी, करणीत अंतर नाही; जनतेच्या सहभागातून विश्वासनामा– संधान

**कोपरगाव । किसन पवार**

राजकारणात आश्वासने अधिक असतात; मात्र आम्ही शब्द आणि कृती यामध्ये कधीही अंतर ठेवत नाही. मी जे बोलतो ते करतो आणि जे करणार आहे तेच प्रामाणिकपणे जनतेसमोर मांडतो, असे ठाम प्रतिपादन भाजपा मित्रपक्षांचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार पराग संधान यांनी केले. प्रचारादरम्यान शहरात आजच विजयी झाल्यासारखे सकारात्मक वातावरण असून, मोठ्या मताधिक्याने विजय मिळणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



कोपरगाव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सामान्य नागरिकांच्या दैनंदिन अडचणी समजून घेण्यासाठी जनतेच्या थेट सूचनांतून विश्वासनामा तयार करण्यात आला आहे. हा विश्वासनामा कोणत्याही बंद दालनात न बनवता शहरातील नागरिक, व्यापारी, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी तसेच विविध घटकांशी संवाद साधून त्यांच्या अपेक्षा, समस्या व सूचना ऐकून तयार करण्यात आल्याचे संधान यांनी सांगितले.


या विश्वासनाम्यात शहरातील रस्ते, धूळ, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य सेवा, शिक्षण, वाहतूक, बाजारपेठेतील सुविधा, महिला व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षितता यांसह अनेक लहान-मोठ्या प्रश्नांवर व्यवहार्य, ठोस आणि ठराविक कालमर्यादेत पूर्ण होणाऱ्या उपाययोजना समाविष्ट करण्यात आल्या आहेत. केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर देण्याचा आमचा स्पष्ट दृष्टिकोन असल्याचेही त्यांनी नमूद केले. सामान्य माणसाला लहान वाटणाऱ्या समस्या प्रत्यक्षात त्याच्या रोजच्या जगण्याशी निगडित असतात. त्या समस्या सोडवणे हीच खरी लोकसेवा आहे, असे सांगत या प्रश्नांवर विधायक, पारदर्शक आणि परिणामकारक उपाय राबवण्याची ग्वाही पराग संधान यांनी दिली. कोपरगावच्या विकासासाठी राजकारणापेक्षा काम, विश्वास आणि संवाद या त्रिसूत्रीवर आधारित कार्यपद्धती स्वीकारली असून, जनतेने दिलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. जनतेच्या सहभागातून उभा राहिलेला हा विश्वासनामा म्हणजेच कोपरगावच्या उज्ज्वल भविष्याचा भक्कम पाया असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# नागवडे कारखान्याचा ३१५० रुपये ऊस दर

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याने चालू गळीत हंगामासाठी उच्चांकी ३१५० रुपये प्रति मेट्रिक टन ऊस दर जाहीर केला आहे. यामध्ये पहिला हप्ता ३००० रुपये प्रति मेट्रिक टन तात्काळ देण्यात येणार असून उर्वरित १५० रुपये दिवाळीला सभासद शेतकऱ्यांना अदा करण्यात येणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनी दिली.

नागवडे कारखान्याचा ५१ वा गळीत हंगाम सुरू असून सभासद व उत्पादक शेतकरी, कामगार, ऊसतोड मजूर, मुकादम, वाहतूकदार व ठेकेदार यांच्या सहकार्याने गाळप हंगाम सुरळीत सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. आजअखेर २ लाख ८२ हजार ३०३ मेट्रिक टन ऊसाचे गाळप झाले असून सरासरी प्रतिदिन ७ हजार मेट्रिक टन ऊसाचे गाळप होत आहे.



कारखान्याचे संस्थापक स्व. शिवाजीराव बापू नागवडे यांनी सभासद शेतकऱ्यांना नेहमीच योग्य न्याय देण्याची भूमिका घेतली. त्यांच्या विचारांचा वारसा जपत नागवडे कारखान्याने मागील गळीत हंगामात दिलेल्या शब्दानुसार ३०५० रुपये प्रति टन ऊस दराची संपूर्ण रक्कम शेतकऱ्यांना अदा केली होती. चालू हंगामातही उच्चांकी ३१५० रुपये दर देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

नागवडे सहकारी साखर कारखाना ही तालुक्याची सहकार गंगोत्री असून विकासाची मूळ मातृसंस्था आहे. फेब्रुवारी-मार्च अखेरपर्यंत सभासद शेतकऱ्यांनी आपला ऊस कारखान्यास गळीत देऊन सहकार्य करावे, असे आवाहन नागवडे यांनी केले.

यावेळी कारखान्याचे उपाध्यक्ष बाबासाहेब भोस, संचालक मंडळ सदस्य व कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे उपस्थित होते. उच्चांकी ऊस दरामुळे सभासद शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून संचालक मंडळाचे अभिनंदन होत आहे.

# सानप यांच्या माध्यमातून काँग्रेसचे चिन्ह अबाधित

**पाथर्डी । रयत समाचार**

पाथर्डी नगर परिषदेच्या निवडणुकीत आता नव्याने चांगलाच रंग भरला आहे. किरकोळ अपवाद वगळता प्रत्येक प्रभागात अटीतटीच्या लढती दिसून येत आहेत. त्यामुळे प्रत्येक प्रभागातील उमेदवार जोमाने कामाला लागले आहेत. प्रभाग क्रमांक ८ ही याला अपवाद नसल्याने येथेही अटीतटीची लढत पहावयास मिळत आहे. सामाजिक कार्याच्या माध्यमातून प्रत्येक घरात पोहोचलेल्या एजाज शेख यांची उमेदवारी भाजपाने ऐनवेळी डावलल्याने त्याचा फायदा काँग्रेसला होत असल्याचे दिसून येत आहे.

महाविकास आघाडीच्या माध्यमातून का होईना पण प्रभाग क्रमांक ८ मध्ये काँग्रेसचे चिन्ह कायम असल्याचे दिसून येत आहे. गेल्या निवडणुकीत डॉ. सुजय विखे पाटील यांना लोकसभेसाठी लाँच करण्याचा भाग म्हणून विखे पाटील परिवाराने संपूर्ण ताकद पणाला लावली होती. परिणामी प्रत्येक प्रभागात काँग्रेस पक्षाचे चिन्ह दिसत होते. त्यानंतर विखे पाटील पिता-पुत्र भाजपवासी झाल्याने, पाथर्डी तालुक्यात काँग्रेस पोरकी झाली होती. परंतु, नासीर शहानवाज शेख यांची काँग्रेसच्या तालुकाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर त्यांनी संघटना बळकट करण्यावर भर दिला.

जुनेद पठाण व बिझिनेस मॅनेजमेंटचे पदवीधर आनंद सानप यांच्यासारखे उच्चशिक्षित सवंगडी संघटनेत सामील झाल्यामुळे शहरासह तालुक्यातही काँग्रेसने चांगलेच बाळसे धरले. परिणामी आनंद सानप यांना महाविकास आघाडीच्या पॅनलमध्ये प्रभाग क्रमांक ८ मध्ये उमेदवारीची संधी मिळाली. या संधीचे सोने करण्याचा निर्धार करत आनंद सानप यांनी जुन्याच परंतु नाविन्यपूर्ण पद्धतीने प्रचार सुरू केला आहे. आनंद सानप यांनी नासीर शेख यांच्या साथीने प्रभाग क्रमांक आठचा सखोल अभ्यास करून महत्वाच्या मुद्द्यांवर काम सुरू केले आहे.



त्यातील कळीचा मुद्दा म्हणजे इंदिरानगर भागातील अनेक रहिवाश्यांच्या घरांची नोंद सातबाराच्या उताऱ्यांवर लागलेली नाही. हा अत्यंत महत्वाचा प्रश्न सोडवण्यावर आनंद सानप भर देणार आहेत. अनेक नागरिकांच्या घरांत पिण्याचे पाणी पोहचत नसल्याने या प्रश्नालाही सानप यांनी गांभिर्याने घेतले आहे. अपुरा व कायम विस्कळीत होत असलेला वीजपुरवठा, अनेक घरांपर्यंत कचरा गाडी पोहचत नसल्यामुळे स्वच्छतेचा गंभीर बनलेला प्रश्न, या प्रभागातील आसरानगर, इंदिरानगर, शिवशक्तीनगर, एडके कॉलनी सपकाळ वस्ती व आव्हाडवस्ती या भागांतील सर्व अतंर्गत रस्ते उत्कृष्ट प्रतीचे करणार असल्याचा निर्धारही सानप यांनी केला आहे.

प्रभागातील खुले भूखंड विकसित करून तिथे गार्डन व मुलांसाठी आनंदविहार, इंदिरानगरसाठी भव्य प्रवेशद्वार व आरोग्य व्यवस्थेवर विशेष लक्ष, असे अनेक प्रश्न हाती घेऊन आनंद सानप या प्रभागातील निवडणुकीस सामोरे जात आहेत.

# स्ट्राँग रूमची हार्ड डिस्क उमेदवारांसमोर बदलली

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

नगरपालिका निवडणुकीसाठी झालेल्या मतदानानंतर मतपेट्या तहसील कार्यालयातील हॉलमध्ये अत्यंत कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत ठेवण्यात आल्या आहेत. स्ट्राँग रूमच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे सतत निगराणी ठेवण्यात येत आहे. आवश्यकतेपेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आल्याने या सुरक्षा व्यवस्थेचे चित्रीकरण करणारी हार्ड डिस्क पूर्ण भरत आल्याने ती सोमवारी सर्व उमेदवार, शासकीय अधिकारी व माध्यम प्रतिनिधींच्या उपस्थितीत



बदलण्यात आली.

या वेळी नगराध्यक्षपदाचे उमेदवार श्रीनिवास बिहानी, प्रकाश चित्ते, अशोक थोरे, काँग्रेसचे मुजफ्फर शेख, रवि भांबरे, निलेश भालेराव, विविध प्रभागांतील नगरसेवक पदाचे उमेदवार, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार मिलिंद कुमार वाघ, सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप, निवडणूक यंत्रणेतील अधिकारी-कर्मचारी तसेच पत्रकार उपस्थित होते. याबाबत माहिती देताना तहसीलदार मिलिंद कुमार वाघ यांनी सांगितले की, बसवण्यात आलेली हार्ड डिस्क मूळतः पुरेशी होती. मात्र, अतिरिक्त सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित केल्यामुळे डिस्कची क्षमतामर्यादा लवकर पूर्ण झाली. सध्या चार दिवसांचा डाटा साठवण्याची क्षमता शिल्लक होती; मात्र पुढील काही दिवसांचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून नवीन हार्ड डिस्क बसविण्यात आली आहे. आता २१ तारखेला होणाऱ्या मतमोजणीपर्यंतचा संपूर्ण डाटा या हार्ड डिस्कमध्ये सुरक्षितपणे साठवला जाणार आहे. यावेळी सर्व उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींना स्ट्राँग रूममधील सुरक्षा व्यवस्थेचे लाईव्ह चित्रीकरण दाखवण्यात आले. संपूर्ण प्रक्रियेवर सर्वांच्या सह्या घेण्यात आल्या. बदललेली हार्ड डिस्क सुरक्षित पाकिटात सील करून स्ट्राँग रूममध्येच ठेवण्यात आली. सर्व उमेदवारांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडली.

# डॉ. सलीम यांचा गुरुकुल सेवाभूषण पुरस्काराने सन्मान

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

येथील बैतुशशिफा हॉस्पिटल व फाउंडेशनचे अध्यक्ष तसेच विद्रोही सामाजिक चळवळीचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते डॉ. सलीम सिकंदर शेख गुरुकुल विश्वपीठ वडगाव शेरी पुणे येथील नावाजलेल्या विश्वपीठच्या वतीने पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गुरुकुल विश्वपेठचे डॉ. भागवत गुरुजी यांच्याकडून शेख यांनी केलेल्या समाजसेवेचे कणखर कार्य तसेच लेखणीच्या माध्यमातून समाजात केलेली जनजागृती, वैद्यकीय क्षेत्रात केलेले कार्य, वृक्षारोपण



शिक्षण क्षेत्रात अल् आफक फाउंडेशनच्या माध्यमाने यांचे योगदान, दरवर्षी महापुरुषांच्या जन्मदिनी केलेले कार्य, रक्तदान शिबिर तसेच व्याख्याने आयोजित करणे तसेच मुशायरे संमेलन, विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिरे आयोजित केल्याबद्दल पुरस्कार देण्यात आला आहे. मिल्लतनगर उपनगरामधील प्रसिद्ध डॉ. सलीम सिकंदर शेख हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात आघाडीवर आहेत. शहरातील वेगवेगळ्या छोट्या मोठ्या कार्यात त्यांचा नेहमीच पुढाकार असतो. रमजान महिन्यात " रोजा " विषयी अत्यंत सखोल आणि चांगली सोप्या भाषेत माहिती लिहून त्यांनी दररोज मालिकेद्वारे दरवर्षी मोठे आणि विस्तृत असे लिखाण करून मुस्लिम समाजात जागृती केली आहे. गोरगरीब दिन दलित यांच्यासाठी ही डॉ. शेख यांनी मोठे काम केले आहे. गुरुकुल विश्व पिठाचे कुलगुरू ईश्वर प्रिय डॉक्टर अजय चंद्र भागवत गुरुजी यांच्याकडून नगर जिल्ह्यात हा पुरस्कार डॉक्टर शेख यांना पहिल्यांदाच मिळालेला आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे काकर समाजाचे प्रा. इकबाल काकर, इंजि.राजू पठाण, राजू शेख, ताजुभाई पठाण, फरहान शेख, मोटू खान, सुफियान शेख यांच्यासह मिल्लतनगर, फातिमा हाऊसिंग सोसायटीसह विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# भारतीय सेनेत निवडीबद्दल ग्रामस्थांकडून सत्कार



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

मढेवडगाव ग्रामस्थांसाठी अभिमानाची बाब ठरावी अशी कामगिरी गावातील युवक-युवतींनी करून दाखवली असून, त्यांची भारतीय सेनेत निवड झाली आहे. साहिल रामदास ससाने यांची मराठा बटालियन, बेळगाव येथे निवड झाली, तर बाळकृष्ण दत्तात्रय वाबळे यांची इंजिनिअर रेजिमेंट, पुणे येथे नियुक्ती झाली. तसेच दिव्या दत्तात्रय वाबळे हिची यापूर्वीच भारतीय सेनेच्या मिलिटरी पोलिस विभागात निवड झाली असून, तिने बंगळुरू येथे सहा महिन्यांचे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले. सध्या तिची पंजाब राज्यातील पटियाला कॅन्ट येथे बदली झाली आहे. या सर्व नवनियुक्त सैनिकांच्या सन्मानार्थ सैनिक संघटना मढेवडगावच्या वतीने विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास सुभेदार मोहन शिंदे, मेजर भगवान मोहिते, मेजर भास्कर झिटे, मेजर धनंजय मांडे, मेजर राजेंद्र मोहिते तसेच सैनिक संघटनेचे संस्थापक मेजर नवनाथ शिंदे उपस्थित होते.

## किस्से निवडणुकीचे...

**काशी करून आलो, आता निकाल देवाच्या हाती**

**सलीमखान पठाण**



श्रीरामपूर नगरपालिका निवडणुकीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान झाले. मात्र निवडणूक आयोगाच्या कारभारामुळे मतमोजणी व निकाल २० डिसेंबरपर्यंत लांबला आहे. या कालावधीत एकीकडे शासकीय यंत्रणेवरील कामाचा ताण वाढला असताना, दुसरीकडे उमेदवारांचे टेन्शनही वाढले आहे. दररोज होणाऱ्या चर्चा, अंदाज, निष्कर्ष आणि राजकीय तर्कवितर्क यामुळे उमेदवारही बेजार झाले आहेत. काहींनी देवाचा धावा केला, तर काहींनी देवदर्शनाला प्राधान्य दिले. विविध देवस्थानांचे दर्शन घेऊन देव प्रसन्न करून निवडणुकीत यश मिळविण्याचा प्रयत्न उमेदवारांकडून सुरू असल्याचे चित्र आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार व ज्येष्ठ नेते अशोक थोरे हे दिलखुलास व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. प्रत्येकाशी हसतमुखाने संवाद साधताना ते नेहमीच काही ना काही कोटी करत वातावरण हलकेफुलके करतात. काल तहसील कार्यालयात स्ट्राँग रूमची हार्ड डिस्क बदलण्यात आली. यावेळी नगराध्यक्षपदाचे भाजप उमेदवार श्रीनिवास बिहानी, शिवसेना (शिंदे गट) उमेदवार प्रकाश चित्ते, शिवसेना (उबाठा) उमेदवार अशोक थोरे, काँग्रेसचे ज्येष्ठ नगरसेवक मुजफ्फर शेख, अपक्ष उमेदवार निलेश भालेराव, इतर पक्षांचे प्रतिनिधी रवी भांबरे तसेच पत्रकार व नागरिक उपस्थित होते. या वेळी खेळीमेळीच्या वातावरणात निवडणुकीबाबत टीका-टिप्पणी सुरू होती. अशोक थोरे यांनी देवदर्शनाचा विषय काढत, "मी तर काशी करून आलो, आता निकाल देवाच्या हाती," असे सांगत उपस्थितांमध्ये हास्यकल्लोळ निर्माण केला. वाराणसी येथे देवदर्शनासाठी केलेल्या प्रयत्नांची माहितीही त्यांनी दिली. त्यामुळे सर्वच उमेदवार काहीसे रिलॅक्स झाल्याचे दिसून आले. मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी निवडणूक प्रक्रियेमुळे शासकीय यंत्रणेवर आलेल्या ताणाचा उल्लेख करत, "कधी एकदाची मतमोजणी होईल आणि आम्ही इतर कामांकडे लक्ष देऊ," अशी अपेक्षा व्यक्त केली. तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांनी सर्व यंत्रणा सज्ज असल्याचे सांगताच एकच हशा पिकला. मात्र मतमोजणीची यंत्रणा पूर्णपणे तयार असल्याचे स्पष्ट करताच पुन्हा एकदा वातावरणात हास्य फुलले. एकूणच मतमोजणी लांबल्यामुळे शासकीय यंत्रणा व उमेदवार काहीसे उद्विग्न झाल्याचे या चर्चांमधून जाणवले. शहरात कोण कोण काशी करून आले, तर कोण कोण इतर देवदर्शन घेऊन आले, याच्या चर्चा आता चौकाचौकात, कट्ट्यांवर तसेच मॉर्निंग वॉकदरम्यानही रंगू लागल्या आहेत.

# आदिक– विखेंच्या चमत्काराची श्रीरामपूरला प्रतिक्षा

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

राजकारणात सक्रिय झाल्यापासून दोघेही पहिल्यांदाच एका स्टेजवर चमकले. भाषणासाठी दोघेही धुरंदर. राजकारणापेक्षा दोघांच्या पाठीशी समाजकारणाचा मोठा वारसा असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव आणि प्रवक्ते अविनाश आदिक आणि नावासारखाच राजकारणात दबदबा निर्माण करणारे सुजय विखे यांच्या चमत्काराची संपूर्ण शहरासह मुस्लिम बहुल वार्ड नंबर दोन मध्ये मोठी प्रतीक्षा आहे.

श्रीरामपूर नगरपालिकेची निवडणूक एका वेगळ्या वळणावर येऊन स्थिरावली. ३० वर्षाहून अधिक काळ नगरपालिकेची सत्ता हातात ठेवणाऱ्या काँग्रेसच्या ससाने यांना लोकनियुक्त माजी नगराध्यक्ष अनुराधा आदिक यांनी गेल्या दहा वर्षांपूर्वी सुरुंग लावला. या निवडणुकीत त्याच नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार राहतील असा अखेरपर्यंतचा विश्वास राजकीय तडजोडीत अखेरच्या क्षणी फोल ठरला.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अविनाश आदिक यांना श्रीरामपूर नगरपालिकेत युती करण्यासंदर्भात सर्वाधिकार बहाल केल्यानंतर सुजय विखे यांनी मॅरेथॉन बैठकीत निवडणुकीचा बिगुल फुंकला.अखेरच्या टप्प्यात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, अविनाश आदिक आणि डॉ. सुजय विखे पाटील यांनी निवडणुकीत रंग भरला. अतिशय नियोजनबद्ध अशा प्रकारे या निवडणुकीची या तिघांनी रचना करत ती पार पाडली.



श्रीरामपूर शहरात प्रत्येक निवडणुकीत मुस्लिम बहुल भागातील वॉर्ड नंबर दोन मधील मतदारास विशेष आणि अधिकाधिक महत्त्व आहे. या भागातील मतदार जिकडे झुकेल तो उमेदवार निवडूनच येतो. स्व. गोविंदराव आदिक, स्व.बाळासाहेब विखे पाटील,जयंत ससाणे यांनी याच मुस्लिम बहुल भागातील मतदारांवर आपली राजकारणाची उंची जगभरात नेली. पालिकेच्या या निवडणुकीत सुजय विखे हे राजकारणात सक्रिय झाल्यानंतर पहिल्यांदाच या भागात पोहोचले. त्यांच्या भाषणाची उत्कंठा ती होतीच. मतदारांनी त्यांना दादही दिली. मुस्लिम बहुल भागात वार्ड नंबर दोन मध्ये सर्वाधिक निधी हा स्व. गोविंदराव आदिक आणि माजी खासदार बाळासाहेब विखे पाटील यांनी दिल्याची आठवण करून देत विकास ही त्यांनीच केल्याचा सांगून सुजय विखे यांनी निवडणूकीत रंग भरला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचेही या भागात विशेष आकर्षण आहे. " एकाच पक्षाच्या मागे तुम्ही किती दिवस राहणार असा काँग्रेस पक्षाचे नाव न घेता खडा सवालही त्यांनी करून मुस्लिम समाजाला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडले.



मुस्लिम बहुल वार्ड नंबर दोन हा भाग स्व. आदिक यांच्या मर्जितला समजला जातो. सुजय विखे यांनी खास रणनीती आखत या सभेस अविनाश आदिक यांना शेवटी भाषण करायला सांगत आपली मुत्सद्देगिरी सिद्ध केली. अविनाश आदिक आणि सुजय विखे यांनी येथे घेतलेल्या सभेमुळे वार्ड नंबर दोन मधील मुस्लिम समाज चार्ज झाला आहे.

"भारतात प्रत्येकाला आपल्या इच्छेनुसार राहण्याचा अधिकार आहे, असा आवाज सुजय विखे यांनी वॉर्ड नंबर मध्ये फुंकल्यामुळे मुस्लिम समाजात चैतन्य पसरले आहे. अविनाश आदिक, सुजय विखे या दोघांनी एकत्रित राजकीय प्रवासात पहिल्यांदाच हजेरी लावली त्याचा चमत्कार होतो का त्याची श्रीरामपूर शहरासह वार्ड नंबर दोन लाख मोठी प्रतीक्षा आहे; मात्र यासाठी मतमोजणी होऊ द्यावी लागणार आहे.

# सर्वांचा लाडका, हरहुन्नरी लक्ष्या

**जवळपास दोन अडीच दशके मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लक्ष्या अर्थात लक्ष्मीकांत बेर्डे यांचा आज स्मृतिदिन. लक्ष्या म्हणजे मराठी चित्रपटसृष्टीला पडलेले एक विनोदी स्वप्न. लक्ष्या या नावाशिवाय मराठी चित्रपटाचा इतिहास लिहिलाच जाऊ शकत नाही. लक्ष्मीकांत बेर्डे या त्याच्या पडद्यावरील नावापेक्षा लक्ष्या या नावानेच तो अधिक ओळखला जातो कारण हे नाव त्याला प्रेक्षकांनी दिले आहे.**

लक्ष्या हा मराठी प्रेक्षकांना आपल्यातीलच एक वाटायचा म्हणूनच दहा वर्षांच्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी लक्ष्यावर अतोनात प्रेम केले. जवळपास दोन अडीच दशके आपल्या सहज - सुंदर, विनोदी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या लक्ष्याचा जन्म २६ ऑक्टोबर १९५४ रोजी झाला. लहानपणापासून अभिनयाची आवड असलेल्या लक्ष्याने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात टुरटुर या नाटकाद्वारे केला. टुरटुर हे त्याचे पहिलेच नाटक कमालीचे हिट झाले आणि या नाटकातील त्याची भूमिकाही प्रेक्षकांना आवडली. त्यानंतर शांतेचं कार्ट चालू आहे, बिघडले स्वर्गाचे दार या नाटकातून त्याने केलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना भावल्या. ही नाटके देखील हिट झाली.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

लागोपाठच्या नाटकात विनोदी भूमिका करून लक्ष्या नाट्य सृष्टीत आघाडीचा विनोदी अभिनेता म्हणून पुढे येऊ लागला. याच भूमिकांच्या जोरावर त्याला मराठी चित्रपटातही संधी मिळाल्या. अर्थात नाटका प्रमाणे इथेही त्याला विनोदी भूमिकाच मिळाल्या त्यानेही या भूमिकांचे सोने करत त्याला मिळालेल्या विनोदी भूमिकांना न्याय दिला .

त्याच्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना खूप आवडल्या. त्याची लोकप्रियता वाढू लागली. लक्ष्या या नावाने आबालवृद्धांमध्ये त्याची लोकप्रियता पसरली. त्याचे चित्रपट प्रचंड यशस्वी झाले. त्याची जोडी जमली ती महेश कोठारे यांच्यासोबत. महेश कोठारेंचा चित्रपट आणि लक्ष्या नाही असे सहसा घडलेच नाही. कारण महेश कोठारे आणि लक्ष्या ही जोडी म्हणजे यशाची खात्री अशी ओळखच बनली. या दोघांचा चित्रपट म्हणजे मनोरंजनाची शंभर टक्के हमी. या दोघांनी एकत्रित भूमिका केलेले धूमधडाका, धडाकेबाज, थरथराट, दे दणादण, झपाटलेला असे कितीतरी चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी झाले. यशस्वीच नाही तर या चित्रपटांना प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले.



लक्ष्याने सचिन पिळगावकर यांच्या सोबत केलेला अशी ही बनवा बनवी हा चित्रपट देखील हिट झाला. लक्ष्या आणि अशोक सराफ या दोघांचीही जोडी जमली. या दोघांनी एकत्रित अनेक चित्रपट केले आणि ते यशस्वीही झाले. ८० आणि ९० च्या दशकात लक्ष्या आणि अशोक सराफ या जोडीने मराठी चित्रपट सृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला. ही जोडी म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीतील राम लक्ष्मणाची जोडी. या दोन्ही कलाकारांचे ट्युनिंग अतिशय चांगले जमले होते. या दोघांनी मराठी मनांचे मनोरंजन करीत अनेकांना आयुष्यातील तणाव, दुःख विसरायला लावून आनंदाचे कारंजे फुलविले. मराठीत लोकप्रियतेच्या शिखरावर असताना लक्ष्याला हिंदी चित्रपट सृष्टीतून चांगल्या ऑफर येऊ लागल्या. त्यातील काही ऑफर त्याने स्वीकारल्या. राजश्री प्रॉडक्शन्सच्या मैने प्यार किया या चित्रपटात त्याला सलमान खानच्या मित्राची भूमिका मिळाली ती त्याने छान निभावली.

याशिवाय अनेक हिंदी चित्रपटात त्याने भूमिका केल्या मात्र त्याच्या अभिनयाचा कस लागेल अशा भूमिका त्याला हिंदीत मिळाल्या नाहीत त्या त्याला मिळाल्या मराठीतच. पु ल देशपांडे यांनी लिहिलेल्या एक होता विदूषक या जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात मुख्य भूमिका निभावली ती लक्ष्याने. या चित्रपटात त्याने केलेल्या गंभीर भूमिकेने त्याच्या अभिनय क्षमतेवर शिक्कामोर्तब केले.

हा चित्रपट तिकीट बारिवर अपयशी ठरला तरी त्यातील त्याच्या गंभीर भूमिकेने त्याला अनेक पुरस्कार मिळवून दिले. लक्ष्याने विनोदी भूमिका अधिक केल्या आणि त्या यशस्वीही झाल्या म्हणून विनोदी अभिनेता असे त्याचे वर्णन करणे हा त्याच्यावर अन्याय ठरेल. गंभीर भूमिकाही उत्तम प्रकारे करू शकतो हे लक्ष्याने एक होता विदूषक तसेच लेले विरुद्ध लेले आणि सर आले धावून या नाटकातून दाखवून दिले. आयुष्यभर प्रेक्षकांना हसवणारा हा कलाकार १६ डिसेंबर २००४ रोजी प्रेक्षकांना दुःखाच्या सागरात बुडवून काळाच्या पडद्याआड गेला. विनोदाचा अचूक टायमिंग साधणारा, अभिनयाची दैवी देणगी लाभलेल्या सर्वांच्या लाडक्या हरहुन्नरी लक्ष्याला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



# डॉ. कामत यांच्या 'मनोमनी' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

डहाणूकर कॉलेज, घैसास सभागृह, विलेपार्ले येथे डॉ. मनीषा कामत यांच्या ''मनोमनी'' काव्यसंग्रहाचे प्रकाशन शनिवार, १३ डिसेंबर २०२५ रोजी संध्याकाळी सुप्रसिद्ध अभिनेत्री चिन्मयी सुमीत राघवन यांच्या हस्ते यशस्वीपणे पार पडले. मनीषा कामत ह्या पूर्वाश्रमीच्या मनीषा कुळकर्णी, पार्ले टिळक विद्यालयातून शिक्षण पूर्ण करून डॉ. झाल्या आणि सध्या अमेरिकेत स्थायिक आहेत.

डॉ. मनीषा कामत यांनी काही एकांकिका लिहिल्या असून त्यात लहान भूमिका केल्या आहेत. त्यांचे पती सलील प्रतापराव कामत हे संगणक अभियंता म्हणून अमेरिकेत स्थायिक असून, तबला व ढोलक वाजवण्यात तसेच गायनात कुशल आहेत कार्यक्रमाची सुरुवात डॉ. मनीषा यांनी लिहिलेल्या नांदीने, संपदा मनीष नाडकर्णी यांनी आपल्या सुमधुर गायनाने केले. कवयित्री डॉ. मनीषा आणि सलील कामत यांची मुलाखत मनीष अविनाश नाडकर्णी यांनी घेतली. तर डॉ. मनीषा यांची मुलगी कु. ऋचा हिने आईची कविता सादर केली.

डॉ. मनीषा यांच्या काव्यरुपांचे सादरीकरण, नांदी सादरीकरण, शायरी, कविता वाचन आणि शिक्षकांचा सत्कार हे सर्व मनःस्पर्शी अनुभव ठरले. उपस्थित प्रत्येकाच्या हृदयात कायम राहील, अशी भावना व्यक्त करत सर्वांनी डॉ. मनीषा कामत यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि त्यांच्या काव्यसंग्रहासाठी शुभेच्छा दिल्या.

सुप्रसिद्ध संगीत शिवस्वराज्यगाथा या कार्यक्रमाचे कवी, संगीतकार व गायक अनिल शशीकांत नलावडे यांचाही समारंभात सहभाग होता. पार्ले टिळक विद्यालयाच्या शिक्षकांचा हृद्य सत्कार कार्यक्रमाचे आकर्षण ठरला. डॉ. मनीषा आणि सलील कामत यांना आशीर्वाद देण्यासाठी गोरेबाई, देवबाई, नवाथेबाई, तांबोळीबाई, वेलणकरबाई, वावीकरबाई, बापटबाई, पेठेबाई आणि चुरीबाई उपस्थित होत्या प्रकाशन सोहळा डॉ. मनीषा आणि सलील कामत आणि त्यांच्या कुटुंबीय तसेच मित्रपरिवाराच्या सहकार्याने साजरा करण्यात आला. उपस्थित रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमानंतर जुने मित्र आणि नातेवाईक गप्पा मारत अल्पोपहाराचा आस्वाद घेत राहिले आणि छायाचित्रांच्या स्वरूपात समारंभाच्या आठवणी कायमच्या जतन केल्या.

# नवा डिजिटल मालमत्ता नोंदणी कायदा रद्द करा

## बेळगाव बार असोसिएशनचे आंदोलन



**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

कर्नाटक सरकारने मंजूर केलेला नवा डिजिटल मालमत्ता नोंदणी कायदा तात्काळ रद्द करण्यात यावा, तसेच बेळगाव येथील कर्नाटक राज्य ग्राहक विवाद निवारण आयोगाच्या खंडपीठासाठी पीठासीन अधिकाऱ्यांची तातडीने नियुक्ती करावी, अशी ठाम मागणी बेळगाव बार असोसिएशनने केली आहे. या मागण्यांसाठी बार असोसिएशनच्या वतीने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात धरणे आंदोलन करण्यात आले.

बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. बसवराज मुगळी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना निवेदन सादर करण्यात आले. आंदोलनादरम्यान ॲड. अमर येळ्ळूरकर यांनी नव्या डिजिटल नोंदणी कायद्याबाबत आपली भूमिका मांडली.

ते म्हणाले की, बेळगाव उपनोंदणी कार्यालयातील गैरकारभाराचा प्रश्न गंभीर बनला आहे. एखादी व्यक्ती आयुष्यभर कष्ट करून आपल्या कुटुंबासाठी मालमत्ता खरेदी करते. मात्र नव्या डिजिटल नोंदणी कायद्यामुळे कर्नाटकातील कोणत्याही भागात बसून कुठल्याही जिल्ह्यातील मालमत्तेचा व्यवहार करता येणार आहे. उदाहरणार्थ, बेळगावमधील मालमत्तेचा व्यवहार एखादी व्यक्ती हासनमध्ये बसून करू शकते. अशा परिस्थितीत नागरिकांच्या मालमत्ता कितपत सुरक्षित राहतील, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

सध्या उपनोंदणी कार्यालयांमध्ये कायदेशीर ज्ञान नसलेल्या एजंटांचा सुळसुळाट असून, याला बार असोसिएशनचा तीव्र विरोध आहे, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना सादर करण्यात आलेल्या निवेदनात बेळगाव येथील कर्नाटक राज्य ग्राहक विवाद निवारण आयोगाचे खंडपीठ सध्या अध्यक्ष व सदस्यांच्या अभावामुळे प्रभावीपणे कार्यरत नसल्याचा मुद्दा मांडण्यात आला आहे. यामुळे अनेक प्रकरणे प्रलंबित असून नागरिकांना न्यायासाठी मोठा विलंब सहन करावा लागत आहे. त्यामुळे बेळगाव खंडपीठासाठी पूर्णवेळ अध्यक्ष व सदस्यांची तातडीने नियुक्ती करण्याची मागणी बार असोसिएशनने केली आहे.

या कायद्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणार असून, उपनोंदणी कार्यालयाच्या हद्दीतील मालमत्तांची नोंद त्याच कार्यालयात होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच मालमत्ता व्यवहाराशी संबंधित दस्तऐवजांची नोंद केवळ अधिकृत परवाना असलेल्या वकिलांमार्फत किंवा बाँड रायटरकडूनच करण्यात यावी, अशी मागणी केली.

# महानगरपालिका निवडणूक कार्यक्रम जाहीर; राजकीय हालचालींना वेग

**अहमदनगर । रयत समाचार**

राज्य निवडणूक आयोगाने (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) राज्यातील २८ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला असून, त्यानुसार अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून हा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

निवडणूक कार्यक्रमानुसार मतदार यादीसाठी ग्राह्य धरण्याची तारीख मंगळवार ता. १ जुलै २०२५ असा निश्चित करण्यात आला आहे. महानगरपालिका आयुक्तांमार्फत निवडणूक कार्यक्रमाची सूचना शासन राजपत्रात तसेच किमान दोन स्थानिक वृत्तपत्रांत गुरुवार दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याची प्रक्रिया मंगळवार ता. २३ डिसेंबर २०२५ ते सोमवार ता. २९ डिसेंबर २०२५ या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत होणार असून, मंगळवार ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत नामनिर्देशनपत्रे स्वीकारली जाणार आहेत. गुरुवार ता. २५ डिसेंबर व रविवार ता. २८ डिसेंबर रोजी नामनिर्देशनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.

नामनिर्देशनपत्रांची छाननी बुधवार ता. ३१ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे. वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी छाननी पूर्ण झाल्यानंतर तात्काळ प्रसिद्ध करण्यात येईल. उमेदवारी मागे घेण्याची अंतिम





मुदत शुक्रवार दि. २ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत असून, निवडणूक चिन्हांचे वाटप व अंतिम उमेदवारांची यादी शनिवार दि. ३ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

आवश्यक असल्यास मतदान गुरुवार ता. १५ जानेवारी २०२६ रोजी होणार असून, मतमोजणी व निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया शुक्रवार दि. १६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून राबविण्यात येणार आहे. निवडणूक निकाल शासन राजपत्रात सोमवार दि. १९ जानेवारी २०२६ पर्यंत प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निवडणुकीमुळे शहरातील राजकीय हालचालींना वेग आला असून, सर्वच राजकीय पक्षांकडून तयारीला सुरुवात झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

# इंग्लिश एक्झिबिशनमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास व कौशल्यांचा सर्वांगीण विकास- प्राचार्य तोरणे

**भिंगार । रयत समाचार**

आजच्या स्पर्धात्मक युगात इंग्रजी भाषा ही केवळ एक विषय नसून भविष्यातील संधीचे प्रभावी साधन आहे. इंग्लिश एक्झिबिशनमुळे विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात वाढ होते, त्यांचे संभाषण कौशल्य विकसित होते तसेच व्यवहारिक ज्ञानात भर पडते, असे प्रतिपादन प्राचार्य तथा सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे यांनी केले.

भिंगार येथील श्रीमती ॲबट मायादेवी गुरुदित्ताशाह हायस्कूल येथे आज आयोजित करण्यात आलेल्या इंग्लिश एक्झिबिशनचे उद्घाटन प्राचार्य प्रमोद तोरणे यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्याध्यापक नारायण अनभुले, ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक मुस्तकीम पठाण, पर्यवेक्षिका कविता शिंदे तसेच पद्मजा सुरकुटला उपस्थित होत्या.

पुस्तकी ज्ञानाच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेत प्रभावीपणे संभाषण करता यावे, या उद्देशाने या एक्झिबिशनचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी विविध वर्किंग मॉडेल्स सादर केली. त्यामध्ये Opposite Words, Rhyming



Words, Parts of Speech, Tenses, Synonyms, Types of Sentences, Name of Things, Articles, Literature आदी विषयांचा समावेश होता.

नववीतील विद्यार्थ्यांनी इंग्रजी साहित्यिकांवर आधारित मॉडेल्स तयार करत विल्यम शेक्सपियर, जॉन कीट्स, सुधा मूर्ती यांसारख्या लेखकांची माहिती प्रभावीपणे मांडली. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला असून एक्झिबिशनला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. इंग्रजी विषयाविषयी गोडी निर्माण करणारा आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणारा हा उपक्रम ठरल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# आयुर्वेदामृत संघाकडून १४२ निराधारांना ब्लँकेट

**अहमदनगर । रयत समाचार**

वाढत्या थंडीमुळे रस्त्यावर, फूटपाथवर तसेच बस स्थानक व रेल्वे स्टेशन परिसरात झोपणाऱ्या गोरगरीब व निराधार नागरिकांचे हाल वाढले आहेत. या पार्श्वभूमीवर आयुर्वेदामृत निसर्गोपचार सेवाभावी संघाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत शहरातील माळीवाडा, बस स्थानक, रेल्वे स्टेशन व फूटपाथ परिसरात झोपणाऱ्या निराधार नागरिकांना तब्बल १४२ ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. या वेळी आयुर्वेदामृत निसर्गोपचार सेवाभावी संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संतोष साळवे, खजिनदार संकेत खेतमाळीस, गोरक्ष काळे, अहमदनगर बार असोसिएशनचे सचिव ॲड. संदीप बुरके, ॲड. सतीश गिते, आरती उफाडे, जितेंद्र गांधी, संदीप चौधरी, प्रशांत जाधव, सागर निपसे, निकुल टिपरे, आकाश दिवे, योगेश कदम, संकेत व्यवहारे, चेतन जाधव, सुशील घंगाळे आदी उपस्थित होते.

# बाहेरचा उमेदवार लादल्याने मतदारांत नाराजी- काळोखे

**पाथर्डी । रयत समाचार**

प्रभाग क्रमांक दोनमधील मतदारयादीत नांव नसलेला उमेदवार लादण्याची वेळ भाजपावर आली आहे. सदर उमेदवाराचे नांव या प्रभागातील मतदारयादीत तर नाहीच, शिवाय त्यांच्या परिवारातील एकाही सदस्याचे नाही. ज्यांनी कधीही या प्रभागात सामाजिक उपक्रम हाती घेतले नाहीत, सर्वसामान्यांच्या एकाही प्रश्नावर आवाज उठवला नाही, असा उमेदवार लादल्याने या प्रभागातील मतदारांत तीव्र नाराजी असल्याचे प्रतिपादन आकाश काळोखे यांनी केले आहे.

प्रभाग क्रमांक दोनमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजीत पवार गटाची उमेदवारी करत असलेले काळोखे म्हणाले, ज्यांचा या प्रभागाशी दुरान्वयेही संबंध आला नाही ते या प्रभागातील समस्या कशा पद्धतीने सोडवणार ? मुळात या प्रभागातील समस्यांची त्यांना माहितीच नाही. तरीही भाजपाच्या नेतृत्वाने त्यांना कोणत्या निकषांवर या प्रभागातील मतदारांवर लादले, हे अनाकलनीय आहे. यापूर्वी ते कधीही या प्रभागात फिरकले नाहीत. अनेक मतदार त्यांच्या ओळखीचेही नाहीत. हा प्रभाग कोठून कुठवर आहे हे त्यांना उमेदवारी लादल्यावर माहित झाले. त्यामुळे केवळ नेतृत्वाच्या अट्टाहासाने लादलेला हा उमेदवार म्हणजे या प्रभागातील नागरिकांच्या स्वाभिमानावर अन्याय असल्याची भावना वाढीस लागली आहे.



मी बालपणापासून या प्रभागाशी निगडीत आहे. येथील गल्लीबोळांतील समस्यांची मला इत्यंभूत माहिती आहे. त्यासाठी तळमळीने काम करण्याची इच्छा आहे. नागरिकही मला मोठ्या प्रमाणावर समर्थन देत आहेत. हे पाहून माझ्या प्रतिस्पर्धी उमेदवारांच्या पायांखालची वाळू घसरू लागली आहे. त्यामुळे ते गोड बोलून व उसने हास्य करत मतदारांची दिशाभूल करण्याचा केविलवाणा प्रयत्न करत असल्याचे मत काळोखे यांनी व्यक्त केले आहे.

# बेकायदेशीर बांधकामांवर उच्च न्यायालयाची सुमोटो कारवाई

**पणजी । रयत समाचार**

गोव्यात सुरू असलेल्या बेकायदेशीर बांधकामांबाबत बॉम्बे उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने गंभीर दखल घेत स्वतःहून (सुओ मोटो) कार्यवाही सुरू केली आहे. मंजुरीशिवाय उभारण्यात आलेल्या इमारती आणि व्यवसाय, तसेच यापूर्वी पाडकामाचे आदेश देऊनही सुरू असलेले अनधिकृत व्यवहार, यावर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.



सूत्रांच्या माहितीनुसार, पाडकामाचे आदेश असूनही अनेक ठिकाणी बेकायदेशीर इमारती आणि व्यावसायिक आस्थापना सुरूच असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर अशा अनधिकृत बांधकामांमुळे भविष्यात एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी नेमकी कोणाची राहील, याबाबत राज्य सरकारने स्पष्ट भूमिका मांडावी, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

न्यायालयाने या प्रकरणात पुढील आदेश देण्याचे संकेत दिले असून, ही बाब जानेवारी महिन्यात पुन्हा सुनावणीसाठी ठेवण्यात आली आहे. गोव्यातील अनधिकृत बांधकामांचा वाढता प्रश्न आणि त्यातून निर्माण होणारे धोके लक्षात घेता, या प्रकरणाकडे राज्यभराचे लक्ष लागले आहे.